'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec. - 2014

# भारताची अंतर्गत सुरक्षा आव्हान आणि उपाययोजना

**डॉ. कविता धनंजय धर्माधिकारी**
संरक्षण व सामरिक शास्त्र-विभाग प्रमुख
एस्.पी.डी.एम. महाविद्यालय,
शिरपूर जि. धुळे. महाराष्ट्र, भारत

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय एकीकरणास आव्हानं देणाऱ्या घटना रोज नविन रुपात समोर येत आहेत. आपल्या समाजामध्ये परस्परविरोध, अंधानुकरण, अंधविश्वास, अशिक्षा, अनीति, अपकार, असहकार्य, आस्मिता, असंतोष, अन्याय, अपराध, अराजकता, अशांती आणि विक्षोभ यांमुळे ही आव्हान अधिकच वाढली आहे. कोणत्याही राष्ट्राला अंतर्गत व बाह्य धोक्यांपासुन सुरक्षा राखावी लागते. अंतर्गत सुरक्षा ही प्रामुख्याने राष्ट्रशक्तीच्या स्वरुपात दिसते. ती प्राप्त करण्यासाठी देशांतर्गत स्थिरता राखणे महत्वाचे असते. देशांतर्गत घटनांमुळे अराजकता, असमानता निर्माण होते आणि सुरक्षितता धोक्यात येते. यशस्वी परराष्ट्र संबंध आणि मुत्सद्देगिरीने राष्ट्रीय हित सुरक्षित राखून इतर देशांवर आपला प्रभाव कायम ठेवणारा सक्षम देश बाह्य धोक्यापासुन सुरक्षित समजला जातो.

**उद्देश :-**

भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोर असलेल्या आव्हानांचा अभ्यास करुन ती आव्हानं कमी करण्यासाठी काय उपाय करता येतील? हा या संशोधन पेपरचा मुख्य उद्देश आहे. त्या दृष्टीने काही गृहितकं निश्चित केलेली आहेत.

**गृहितकं :-**

१. राष्ट्रीय सुरक्षा ही देशाची प्राधान्य क्रमाची गरज आहे.
२. राष्ट्रीय सुरक्षेचा संबंध प्रादेशिक एकात्मता, राष्ट्रीय एकात्मता, सार्वभौमत्व, लोकसंख्या, औद्योगिक शक्ती, संरक्षण उत्पादन, आर्थिक विकास, सेनादल इत्यादीशी आहे.
३. आरोग्य, शिक्षण, राहाणीमान, यासारख्या मुलभूत गरजांसंदर्भात देशात समानतेची स्थिती नाही.
४. स्थलांतर, मानवी सुरक्षा, सामाजिक विविधता, बेरोजगारी, पर्यावरण असंतुलन या व इतर अनेक कारणांमुळे अंतर्गत सुरक्षा धोक्यात आलेली आहे.

**अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षेची आव्हानं :-**

राष्ट्रीय सुरक्षेचा सर्वसमावेशक अंगाने विचार करता काही आव्हानं दृष्टिपथास येतात. त्यात- १) आर्थिक विषमता २) दहशतवादी कृत्ये ३) नक्षलवादी कारवाया ४) बेरोजगारी समस्या ५) निरक्षरता ६) आरोग्याचे प्रश्न ७) पाणी टंचाई ८) अन्न सुरक्षेचे प्रश्न ९) राजकिय पक्षांतील मतभेद १०) सामाजिक विषमता ११) वाढते ताणतणाव व नैराश्यातून मानसशास्त्रीय नकारात्मकता १२) पोषणामुल्य आहाराकडे दूर्लक्ष त्यातुन शारिरीक व्याधी १३) बदलती

जीवनशैली १४) आरोग्याचे प्रश्न उदा.(HIV, एड्स, मानसिक आजार, व्यायामाकडे दूर्लक्ष, फास्टफूड सेवन) १५) घुसखोरी - सीमेपालीकडून रोजचे हल्ले १६) शहरीकरण, ग्रामीण अर्थ विकासाकडे झालेले दूर्लक्ष १७) जागतिकीकरणामुळे लघु व कुटीर उद्योगांवर झालेले दुष्परिणाम त्यातुन वाढलेली बेरोजगारी १८) बुद्धीजीवींचे परदेशात गमन १९) पाकिस्तान व चीनच्या कारवाया २०) बदलती सामाजिक, आर्थिक, औद्योगिक समीकरणे धार्मिक कट्टरता २२) धार्मिक सांस्कृतिक भिन्नता २३) सांप्रदायिकता २४) सायबर गुन्हे परस्पर अविश्वास २६) परस्पर सहकार्य अभाव २७) स्त्री - पुरुषांचे असमान प्रमाण २८) स्त्रीयांवरील वाढते अत्याचार २९) अतिरिक्त लोकसंख्या वाढल्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, आणि रोजगाराचे निर्माण झालेले प्रश्न ३०) अन्नधान्य साठा मुबलक असुनही त्याच अयोग्य वितरण परिणामी लाखो टन अन्न साठा गोदामात ३१) अंमली पदार्थाचे सेवन ३२) अंमली पदार्थांची तस्करी ३३) छोट्या शस्त्रास्त्रांचा व्यापार ३४) जलप्रदुषण, वायु प्रदुषण, ध्वनी प्रदुषण त्यातुन आरोग्यावर व पर्यावरणावर परिणाम ३५) लघुउद्योगांचे धोक्यात आलेले अस्तित्व ३६) सबसिडीचे कुचक्र. ३७) छुपे युद्ध ३८) पेटंट बद्दलचा संघर्ष ३९) सत्तेचे केंद्रीकरण ४०) भाषीक बेबनाव ४१) जैवविविधतेवर कब्जा करण्याचा इतर देशांचा प्रयत्न ४२) अनावश्यक तंत्रज्ञानाचा प्रवेश ४३) गरिब श्रीमंत यातील वाढलेली दरी ४४) मानव संसाधनाकडे दूर्लक्ष ४५) शेजारील देशांमुळे भारतातील सीमेलगतच्या घटक राज्यात निर्माण होणारी अस्थिरता ४६) नितिमूल्यांचा ऱ्हास ४७) नैसर्गिक साधन संपत्तीचे असमान वितरण ४८) पाणी आणि कृषी क्षेत्र व्यवस्थापनाकडे दूर्लक्ष ४९) अंधश्रद्धेचा पगडा ५०) विभक्त कुटूंबपद्धती मुल्यांचा ऱ्हास ५१) रासायनिक जैविक अण्वीक युद्ध साधनाचा धोका ५२) जागतिक तापमान वाढ यासारख्या देशांतर्गत व बाह्य घटकांमुळे अंतर्गत सुरक्षेसमोर आव्हाने उभी ठाकली आहेत.

कोणतीही व्यक्ती, समाज, देश आणि राष्ट्रीय स्तरावर प्रगती, सर्वत्र शांतता आणि विकासासाठी एकात्मता, एकीकरण हा महत्वपुर्ण आधार असतो. राष्ट्रीय एकता एक अशी मानसशास्त्रीय प्रक्रिया आहे जी परस्पर सहकार्याबरोबरच देशभक्तीच्या भावनेमध्ये वाढ करते. राष्ट्रीय एकात्मतेची स्थापना करुनच राष्ट्र स्वत:स सुरक्षित राखू शकते. त्यांत असमर्थ असल्यास त्याचा शत्रु फायदा घेणार हे निश्चित. राष्ट्रीय एकात्मतेमुळे केवळ राष्ट्रीय सुरक्षाच सुनिश्चित होते असे नाही तर राष्ट्रीय विकास देखिल होतो. राष्ट्रांतर्गत प्रश्नांमुळे, राष्ट्रीय एकात्मतेसमोर एक मोठे आव्हानच निर्माण झाले आहे. त्यातुन सामाजिक सदभाव आणि मानवीय मुल्य कमी होऊ लागले आहेत. जोपर्यंत भुक, दबाव, दमन, हिंसा, दहशत यांमुळे पीडा उत्पन्न होईल तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेची समस्या वाढणारच आहे. गरीबी, बेरोजगारी, लोकसंख्या वाढ, सांप्रदायिकता, सांप्रदायीक हिंसा, वर्णभेद, युवा असंतोष आणि आंदोलन, हिंसा व शोषण, निरक्षरता, आर्थिक विषमता, अपराधी प्रवृत्ती, भ्रष्टाचार, मादक पदार्थांचे सेवन आणि तस्करी, नक्षलवाद, दहशतवाद आणि सामाजिक मुल्यांवर जोपर्यंत अंकुश लावला जात नाही. तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता साध्य होणार नाही. अशा विषम परिस्थितीमध्ये सुख, शांती, कायम राखण्यासाठी या विषयावर विचारविनिमय करण्याची सामुहिक आवश्यकता आहे. कारण राष्ट्रीय सुरक्षा आणि विकासाची आधारशिला राष्ट्रीय एकत्रीकरणावर अवलंबुन असते. त्यासंदर्भात सर्व

समावेशक उपाययोजना अत्यावश्यक आहे. सुरक्षेसमोर आव्हानं उभी ठाकली आहेत. आज प्रत्यक्ष दोन देशांमधील युद्धाची परिस्थिती कमी झालेली आहे. लष्करी धोके- युद्ध धोके यापेक्षाही बिन लष्करी धोक्यांमुळे अंतर्गत सुरक्षा प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यातुन देशाची अंतर्गत सुरक्षा धोक्यात आलेली आहे. देशाच्या सार्वभौमत्वावर प्रश्नचिन्ह लागण्याची वेळ आलेली आहे. अशा परिस्थितीत ठोस अशा राजकिय, सामाजिक निर्णयाबरोबरच खालील उपायांनी हा धोका कमी करता येईल.

**उपाय योजना :-**

१) सर्वप्रथम सुरुवातीपासुन मुलांच्या मनोवृत्तीवर एक असा असिम प्रभाव टाकला पाहिजे की जे परस्पर प्रेम व आपलेपणाची भावना वृद्धींगत करतील. ही मनोवृत्ती संस्कार, शिक्षण आणि कौटुंबिक परिस्थितमुळे वाढीस लागते.

२) शिक्षणात सुधारणा केली पाहिजे. शिक्षणाचा आशय ज्ञानाशी आहे. शिक्षणातुन राष्ट्रीयता आणि मानवता न शिकविता धर्मांधतेच्या चक्रात अडकले तर आपल्या शिक्षणास काहीच अर्थ नाही.

३) राष्ट्रीय सुरक्षेसमोरील जी आव्हानं आहेत त्यांवर सर्वसमावेशक विचार-विनिमय करुन त्यांत काही बदल करणे आवश्यक आहे की, ज्यामुळे सांप्रदायिकता, धार्मिकता, धर्मांधता आणि क्षेत्रीयतेस प्रोत्साहन मिळणार नाही.

४) धर्मास राजनितीपासून वेगळे केले पाहिजे.

५) आर्थिक विषमता दूर करण्यासाठी सक्तीने पावले उचलली पाहिजेत. विकास मार्गात भ्रष्टाचार आणि शक्तीचा दुरुपयोग ही दोन मोठी संकट आहेत. त्यांवर अंकुश लावणे आवश्यक आहे. जनतेने देखिल जागृक राहिले पाहिजे.

६) दहशतवादाच्या मुळाचा शोध घेऊन त्या समस्यांवर विशेष लक्ष देऊन शांततापुर्ण समाधान शोधले पाहिजे की ,त्यातुन संतुलित विकासाचे वातावरण निर्माण होईल. त्यासाठी जी अविकसित राज्य आहेत त्यांचा विकास आवश्यक आहे.

७) **'सर्वधर्म समभाव'** तत्वाचा स्विकार आवश्यक. एक दुसऱ्याच्या धर्माचा आदर केला पाहिजे. एक दुसऱ्याच्या सणसमारंभात सहभाग घेतला पाहिजे. एक दुसऱ्याच्या **धर्मगुरुंचा** सन्मान केला पाहिजे.

८) वर्तमानकाळात सर्वात मोठी आवश्यकता आहे योग्य आणि परिस्थितीनुसार शिक्षण व्यवस्थेची. जगात शस्त्रास्त्र नाही तर ज्ञानावर आधारीत अर्थव्यवस्था प्रचलीत आहे. परंतु आपल्या देशात मात्र अधिक संख्येने नागरिक निरक्षर आहेत.

९) भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी राष्ट्रीय एकता, सचोटी, प्रादेशिक संलग्नता, नैतिकता, नागरिकत्वाचा अभिमान, आर्थिक शक्तीसाठी संसाधनांचा पूर्ण उपयोग करण्याची लष्करी क्षमता यांची आवश्यकता.

१०) प्रचंड सावधानता आवश्यक.

११) सीमापर धोक्यांपासुन राष्ट्रीय हिताच्या रक्षणासाठी लष्करासाठी लागणारी शस्त्रास्त्रे व आधुनिक साधन सामुग्रीमध्ये सातत्याने होत असलेल्या आधुनिकीकरणात स्वयंपूर्ण होणे आवश्यक.

१२) पुरेशी वनस्पती लागवड, प्रदुषण नियंत्रण, समयसुचकता आणि सावधानता यादृष्टीने पर्यावरणीय सुरक्षा सांभाळून सर्वंकष सुरक्षा जोपासण्यास मदत होते.

१३) नैसर्गिक साधन संपत्तीची योग्य जोपासना व त्यांच्या जपुन वापर आवश्यक.

१४) सर्वंकष सुरक्षेवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक. कारण त्यावरच देशाचे भवितव्य, शक्ती अवलंबुन आहे. सर्वंकष सुरक्षेतुनच **मानवी जीवनाचा** विकास साधणे सहज शक्य आहे.

१५) दऱ्याखोऱ्यातील, शहरीभागातील जे कोणी वनऔषधीसह इतर उपयुक्तता प्रयोगाअंती सिद्ध करु शकतील त्यांच्यापर्यंत पेटंट विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोहचले पाहिजे आणि खात्री करुन त्या संशोधकाचा हक्क सुरक्षित केला पाहिजे.

१६) लघु व कुटिर उद्योगांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी त्यांना आर्थिक मदत करणे.

१७) दूर्लक्षित क्षेत्रात औद्योगिकरणाचा विकास करणे.

१८) पायाभुत सेवा सुविधा सर्वसामान्यापर्यंत सुलभपणे पोहचविण्याचा प्रयत्न करणे.

१९) मानव संसाधनाचा, पूर्ण उपयोग करुन घेणे.

२०) तंत्रज्ञांन वैज्ञानिकांना, बुद्धीजीवांना संशोधनासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे.

२१) राष्ट्रांतर्गत सर्व राज्यांमध्ये परस्पर हितसंबंध अधिक संवर्धित करणे.

२२) स्थलांतराचा धोका कमी करण्यासाठी त्यासंबधित रोजगार निर्माण करणे, उद्योगधंद्यांना प्राधान्य देणे.

२३) निर्वासितांशी मानवतेच्या दृष्टीने व्यवहार करुन त्यांचे पुर्नवसन करणे.

२४) धार्मिक आणि वांशीक उदात्तेच्या हेतुने सुरक्षेची भावना वाढविणे.

२५) बिन लष्करी धोक्यांचा गांभिर्याने विचार करुन त्यांचा सखोल अभ्यास करुन ते धोके कसे कमी करता येईल यावर सर्वंकष चर्चा करुन त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे. त्यासाठी देशांतर्गत परस्पर विश्वासाची भावना वृद्धींगत करणे.

२६) नागरी विकास कार्यास प्राधान्य देणे.

२७) जनसंचार माध्यमं, संपर्क माध्यम, सोशल मिडिया याद्वारे नागरिकांमध्ये अधिकाधिक जागृकता घडवुन त्यांच्यात आत्मविश्वास वाढविणे.

२८) आर्थिक सुरक्षेसाठी सेवा व बँकींग क्षेत्रात अधिकाधिक पारदर्शकता आवश्यक.

२९) औद्योगिक आणि कृषी क्षेत्र विकासास अधिकाधिक प्राधान्य देऊन अत्याधुनिक तंत्रानाचा योग्य वापर करुन उत्पादन क्षमता वाढविणे. परिणामी सकल राष्ट्रीय उत्पादनात (GNP) वाढ अपेक्षित आहे. जनतेचे दरडोई उत्पन्न वाढविण्यावर अधिक लक्ष केंद्रित हवे.

३०) देशातील सर्वच क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेपर्यंत प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देणे.

३१) वीज व पाणी प्रत्येक ठिकाणी मिळेल यासाठी दीर्घकाल व सातत्याने प्रयत्नशील राहणारी सक्षम यंत्रणा सिद्ध असावी.

३२) अण्विक, रासायनिक, जैविक साधनांचा प्रतिबंध करण्यासाठी जे करार करण्यात आलेले आहे त्या कराराचे सक्तीने पालन, शेजारील देश व शत्रुदेश कसे करतील याकडे लक्ष देणे आवश्यक.

३३) लहान आणि हलक्या शस्त्रांस्त्राचा उपयोग मानवाविरुद्ध केला जातो आहे त्यातुन सामाजिक आर्थिक राजकिय असंतुलन निर्माण होऊन शांतता आणि सुरक्षेचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. त्यावर नियंत्रण राखण्याच्या हेतुने लहान शस्त्रास्त्रांसाठी शस्त्रनियंत्रण व नि:शस्त्रीकरणचा मार्ग स्विकारणे.

३४) दहशतवादी कारवायांवर प्रतिबंधात्मक उपाय आवश्यक त्यात प्रादेशिक सुरक्षा, वाहतुक, हवाईतळ, रेल्वेस्टेशन, बसस्टॅण्ड, सागरी मार्ग, समुद्र किनारा, आणि देशाच्या सीमा यासारख्या क्षेत्राची नियमित तपासणी टेहाळणी करणे, तद्वतच श्वान पथकांची संख्येत वाढ करणे. अधिक कमांडो फोर्सची निर्मिती, देशांतर्गत देखिल ओळख पत्राची सक्ती व अनिवार्यता, या बाबीकडे लक्ष देणे. दहशतवादी संघटनांची आर्थिक नाके बंदी करणे.

३५) दहशतवाद रोखण्यासाठी विश्वजनमतास एकत्रीत करुन दहशतवादाविरुद्ध आंतरराष्ट्रीय वातावरण तयार करणे आवश्यक आहे.

३६) दारिद्र्य नष्ट करण्याचा सर्वांगिण प्रयत्न, शोषणमुक्त समाजनिर्मिती.

३७) अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, पाणी, शिक्षण हे प्रत्येकांस प्राप्त झालेच पाहिजे यासाठी त्वरीत आणि जागृकतेने पावले उचलणे अत्यावश्यक.

३८) देशामध्ये सर्वांगीण विकासासाठी योजनांची अंमलबजावणी, समाजात एकात्मतेची भावना, मानवता, बंधुभाव, भ्रातृभावाची भावना निर्माण करणे.

३९) अंमली आणि मादक पदार्थांच्या व्यापारामुळे संघटित गुन्हेगारीस प्रोत्साहन मिळून सामाजिक अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतो. अफू आणि कोक शेतीतुन पर्यावरणास धोका पोहचतो. मादक पदार्थांचा व्यापार दहशतवादास पुरक ठरतो. त्यातुन विभागीय आणि अंतर्गत सुरक्षा व शांततेस धोका निर्माण होतो. त्यांवर कठोरपणे निर्बंध घातले पाहिजेत.

४०) सायबर गुन्हे प्रामुख्याने शोध, वाहतुक, उर्जा, बँकींग, लष्कर, मानवी सेवा, व्यापार या क्षेत्रामध्ये अधिक आहे सायबर दहशतवाढ वाढीस लागला आहे त्यासाठी शोध क्षेत्रामध्ये भाषेचा उपयोग करणे, आणि वर्तन संबंधामध्ये आचारसंहिता निर्माण करणे आवश्यक आहे.

४१) बौद्धिक संपदा हक्क, आर्थिक सेवा, बँकींग, व्यापार यासाठी सक्तीचे नियम तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.

४२) राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेत 'मानव' केंद्रबिंदू आहे. आणि म्हणूनच मानवाची सर्वांगीण प्रगती, विकास, कसा होईल हेच तत्व समोर ठेऊन योजना आखल्यात तर माणसाच्या किमान मूलभूत गरजा पूर्ण होऊन तो कुकर्माकडे वळणार नाही.

४३) मानवाच्या इच्छा आकांक्षा प्रचंड वाढल्यामुळे तो समाधानी नाही. त्यांवर एक मात्र उपाय म्हणजे 'हॅवमोर' च्या जागी 'जस्ट इनफ' हे तत्व अंगीकारले पाहिजे. हव्यास न धरता समाधानी राहणे अत्यंत आवश्यक आहे. 'साधी राहणी उच्च विचारसरणी' हे मुल्य बालपणीच रुजविणे अत्यावश्यक.

४४) व्यक्तीस आपल्या भावनांवर नियंत्रण राखण्यांस शिकविले पाहीजे म्हणजे भावनांचा उद्रेक होऊन त्याचे रुपांतर 'डेव्हिल वर्कशॉप' मध्ये होणार नाही.

४५) नियमित व्यायाम, योगाभ्यास, ध्यानधारणा, खेळ, वेळेवर खानपान, सकारात्मक प्रवृत्ती बालकांमध्ये व युवावर्गात निर्माण करणे अत्यावश्यक.

४६) जागतिक तापमान वाढीमूळे (ग्लोबल वॉर्मिंगमुळे) वादळ, महापूर आणि दुष्काळ यासारख्या आपत्तीमध्ये वाढ होईल. समुद्राच्या जलस्तरात वाढ झाल्यामुळे एका देशातील नागरिकांना दुसऱ्या देशात आश्रय घेणे भाग पडेल. याचे अधिक नुकसान गरिब देशांना सोसावे लागेल बाहेरील अशा स्थलांतरीत लोकांमुळे देशाची सामाजिक आर्थिक परिस्थिती अव्यवस्थीत होईल. त्यातुन जातीय समीकरण बिघडेल आणि अंतर्गत व क्षेत्रीय सुरक्षेस धोका निर्माण होईल. अनेक समाज जातीयता, संस्कृती आणि धर्माचे प्रभावी मिश्रण असते. उदाहरणार्थ भारतास बांगलादेशाकडून घुसखोरांची समस्या भेडसावत आहे. बांगलादेशात **खारटपाण्यामुळे शेतीयोग्य** जमीन कमी होऊ लागली आहे. 'इंटरनॅशनल पॅनल फॉर क्लायमेंट चेंज' (IPCC) च्या अनुसार २०५० पर्यंत बांग्लादेशाची ७०% भुमी आणि ३०% अन्नधान्य उत्पादन समुद्रात नष्ट होईल. बांगलादेशात दरवर्षी नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत आहे. त्यातूनच भारतात अवैध रुपात बांगलादेशातुन घुसखोरी वाढलेली आहे. हा एक सर्वात मोठा धोका भारतीय राष्ट्रीय सुरक्षेस आहे.

४७) जागतिक तापमानवाढीमुळे प्रभावीत होणाऱ्या आर्थिक क्षेत्रामुळे मानवी जीवनास प्रचंड नुकसान होईल. त्यातुन आधीच असलेली आर्थिक आणि सामाजिक विषमतेची दरी अधिक वाढेल. भारतातील समृद्धीच्या धामधुमीत मात्र गरिब जिल्ह्यात **माओवादी कारवाया** वाढतील.

४८) ग्लोबल वॉर्मिंगमुळे बर्फ वितळण्याची प्रक्रिया वाढु लागली आहे. त्यामुळे जगातील काही देशांच्या सीमारेषेत परिवर्तन झाल्याचे दृष्टिस पडते. उदा. स्वित्झर्लॅन्ड आणि इटली यांच्यातील सीमा. त्यांत कधी विवाद झाला नाही. पण ग्लोबल वॉर्मिंगमुळे या सीमेत १०० मीटरपेक्षा अधिक अंतर येऊ शकते. भारत आणि चीन यांच्यातील 'मॅकमहोन रेषा' आणि भारत व पाकिस्तान यांच्यातील 'रेडक्लीफ' सीमारेषावर प्रभाव पडू शकतो त्यातून सुरक्षेसमोर एक नवे आव्हान उभे ठाकणार आहे.

४९) भारतीय उपमहाद्विपात ग्लेशियरची (९५७५) स्थिती गंभिर होऊ लागली आहे. ग्लेशियरची विरघळण्याची प्रक्रिया वाढल्यास पाण्याचे भांडार नष्ट होतील आणि भारतासमोर पाण्याचे संकट उभे राहील. भारताच्या कृषीक्षेत्रासाठी ही एक गंभिर समस्या आहे. भारताची अर्धी कार्यशक्ती तेथे आहे. GDP मध्ये १८% योगदान कृषीक्षेत्रातले आहे.

५०) खाद्य सुरक्षा आणि सामाजिक स्थिरता एक असे आव्हान आहे की जे ग्रामीण संरचनेमध्ये मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय गुंतवणूकीची मागणी करीत आहे. त्याचबरोबर हरित तंत्रज्ञानाच्या दिशेने पावल उचलण्याची देखिल आवश्यकता आहे. कार्बन उत्सर्जन कमी कसे करता येईल यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

५१) उर्जेचा वापर अधिक सावधानतेने आणि सांभाळून केला पाहिजे.

५२) प्रत्येक नागरिकाने हे समजणे आवश्यक आहे की, लोकशाही बंदूकीच्या नळीपासून नाही तर लोकशाही आत्मसंयमाचे दुसरे नांव आहे.

**निष्कर्ष :**

जोपर्यंत **<u>हदयामध्ये पवित्रतेचा</u>** उदय होणार नाही, **<u>लोकांमध्ये आपलेपणाची भावना</u>** वृद्धीगंत होणार नाही तोपर्यंत या जीवनाचे कोणतेही मूल्य नाही. भारतास अशा समाजाची आवश्यकता आहे की जो मानवाविरोधी असणाऱ्या कुप्रवृत्तींना समूळ नष्ट करु शकेल. आणि भारतास केवळ भारतामध्येच नाही तर जगातील क्षितीजावर एक संवेदशील, न्यायपुर्ण, समतावादी, व्यापक आणि आपल्या व सर्व जगाच्या समस्यां प्रती अत्यंत जागृक आणि सजग समाजाच्या रुपात स्थापित करु शकेल.

**संदर्भ :**

१. प्रा. ए. पी. चौधरी, 'भारताची राष्ट्रीय सुरक्षा', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, २००३, पृ. १९.
२. डॉ. व्ही.वाय. जाधव, 'भारताची राष्ट्रीय सुरक्षा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११, पृ. १९,२१.
३. दीपक बंका 'भारतीय सामर्थ्य एवं चुनौतियां,' प्रतिभा प्रतिष्ठान, नई दिल्ली, २००८, पृ. २१,२५.
४. कृष्णानंद शुक्ल, डॉ. सुरेंद्रकुमार मिश्र, 'शांति, सुरक्षा और विकास की समस्याएं', राधा पब्लिकेशन, न्यू दिल्ली, पृ. २७०, २७१.
५. डॉ. व्ही.एन. आरोरा, डॉ. नंदकिशोर, डॉ. अभयकुमार सिंह, "दक्षिण एशिया में सुरक्षा चुनौतियों के नए आयाम", मोहित पब्लिकेशन्स , न्यु दिल्ली, २०१२, पृ. १८८,१९७,१९९, २००, ०५.